

पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेत संघटनात्मक फेरबदल

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 16/09/२०25 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 218 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी घेतली राज्यपाल पदाची शपथ

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई: गुजरात राज्याचे राज्यपाल असलेले आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली. राज्यपाल देवव्रत यांनी संस्कृत भाषेतून शपथ घेतली.शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल देवव्रत यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. आचार्य देवव्रत हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.या शपथविधी सोहळ्याला विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, कौशल विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, क्रीडा मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार) मनीषा म्हैसकर व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.सुरुवातीला मुख्य सचिव राजेशकुमार यांनी श्री.देवव्रत यांच्या नियुक्तिसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधीनंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.



# 'तुमच्या नजरेतून महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे' ;विजेत्याला मिळणार 5 लाख रुपये

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राज्यातील पर्यटन स्थळांचा प्रवासी छायाचित्रणांच्या माध्यमातून प्रचार व प्रसिद्धीसाठी 'तुमच्या नजरेतून महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे' (Maharashtra Destinations Through Your Lens)' या उपक्रमात प्रवासी छायाचित्रकारांनी घेतलेल्या छायाचित्रांतील निवडक छायाचित्रातील प्रथम विजेत्याला ५ लाख रूपयांचे पारितोषिक देण्यात येईल, असे पर्यटनमंत्री शंभुराज देसाई यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची १७५ वी संचालक मंडळाची बैठक झाली. यावेळी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई बोलत होते. पर्यटन विभागाचे प्रधानसचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, पर्यटन संचालकडॉ.बी.एन.पाटील,महाव्यव स्थापक चंद्रशेखर जयस्वाल, मुख्य लेखा वित्त अधिकारी जितेंद्र सोनावणे, कंपनी सचिव वर्षा चव्हाण, कायदेशीर सल्लागार संजय ढेकणे उपस्थित होते.पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचे सौंदर्य, वैविध्य आणि सांस्कृतिक समृद्धी याची प्रचार व प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात होण्यासाठी 'तुमच्या नजरेतून महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे' (Maharashtra Destinations Through Your Lens)' हा उपक्रम राबवला जात आहे. तो अत्यंत चांगला आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त पर्यटनप्रेमींनी सहभाग घ्यावा यासाठी प्रथम विजेत्याला २.५० लाख ऐवजी ५ लाख रूपयांचे पारितोषिक देण्यात येईल.महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अखत्यारितील सर्व रिसॉर्ट्सची उत्पन्ननिहाय वर्गवारी करण्यात यावी. रिसार्टचे उत्पन्न वाढविण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येणाऱ्या पर्यटन सुरक्षा दल निर्मितीबाबत वाहने घेण्याच्या कार्यवाहीला गती देण्यात यावी. महामंडळामार्फत निवास कार्य, व्यवसाय विकास, प्रसिद्धी अशा कार्यक्षेत्रात नवीन उपक्रम हाती घेतले आहेत त्यांना गती देण्यात यावी. क्रुझ पर्यटन विकास, जबाबदार पर्यटन, पी.एम.गतीशक्ती उपक्रमाशी सुसंगत डेटा आधारित नियोजन, समन्वय आणि पर्यटन प्रकल्पांचे नियोजन करावे. विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत उपक्रम प्रभावीपणे राबवावेत. सार्वजनिक खासगी भागीदारी धोरणाचा अवलंब करण्यात यावा, गुलदार प्रकल्पाचे काम गतीने करावे असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 16/09/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेची व्यापक मोहीम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिका डेंग्यू व मलेरियासारख्या संसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवत आहे. या मोहिमेअंतर्गत घराघरांत तपासणी, औषध फवारणी, जनजागृती उपक्रम तसेच कठोर दंडात्मक कारवाईला गती देण्यात आली आहे. याच अनुषंगाने १ जून २०२५ पासून आतापर्यंत सुमारे ४ हजार १३७ ठिकाणी नोटिसा बजावल्या असून, १ हजार १४२ जणांवर थेट दंडात्मक कारवाई करून ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली



महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून औषध फवारणी, घराघरांत तपासणी, बांधकामस्थळांवरील पाहणी, कंटेनर तपासणी तसेच जनजागृती कार्यक्रम व दंडात्मक कारवाई अशा बहुआयामी मोहिमांना गती देण्यात आली आहे. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतून समन्वय साधून याबाबतचा एकत्रित आराखडा तयार करण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे डासांची उत्पत्ती कमी होत असून, संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होत आहे.

**तपासणी व कारवाईचा तपशील**

(आकडेवारी १ जून २०२५ पासून १४ सप्टेंबर २०२५ पर्यंतची)

* घरांची तपासणी : ९ लाख हजार ३८० घरांची पाहणी; त्यापैकी १४ हजार २७४ घरांच्या परिसरात डास उत्पत्तीची चिन्हे आढळली.

* कंटेनर तपासणी : निवासी घरे,संस्था,आदी ठिकाणच्या विविध ५१ लाख ८४ हजार ९७२ कंटेनर (भांडी,ड्रम,कुंड्या,पाणी साठवणीची ठिकाणे आदी) तपासले गेले; त्यापैकी १५ हजार ४०७ ठिकाणी डास वाढीस पोषक वातावरण नोंदले गेले.

* टायर पंक्चरची व भंगार दुकाने : २ हजार ११ भंगार दुकाने तपासून तातडीने सूचना व सुधारणा.

* बांधकामस्थळे : २ हजार २१३ ठिकाणी पाहणी करून अस्वच्छता दूर करण्याची कारवाई.

* नोटिसा व दंडात्मक कारवाई : ४ हजार १३७ ठिकाणी नोटिसा बजावल्या तर १ हजार १४२ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करून ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

जनजागृतीवर दिला जातोय भर

महापालिकेने फक्त कारवाईवरच भर न देता जनजागृती व स्वच्छता उपक्रम राबवण्यास देखील प्राधान्य दिले आहे. यामध्ये घराघरांत माहितीपत्रकांचे वितरण, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आरोग्य व स्वच्छतेबाबत प्रशिक्षण, प्रभागस्तरीय विशेष कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिमा व औषध फवारणीची सततची मोहीम असे विविध उपक्रम महापालिका राबवत आहे. याशिवाय आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, घराच्या परिसरात पावसाचे पाणी साचू देऊ नका, घर व आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता ठेवा, असे आवाहन नागरिकांना महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# महापालिकेच्या 141 शाळांमध्ये आफ्टर-स्कूल मॉडेलची सुरुवात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेचा शिक्षण विभाग व ‘दि अप्रेंटिस प्रोजेक्ट’ (TAP) यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे आफ्टर-स्कूल मॉडेलचा शुभारंभ करण्यात आला.याप्रसंगी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, कॅपजेमिनी इंडियाचे एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट प्रसाद शेटये, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रतिनिधी राजश्री तिटकारे, संस्थेचे सहसंस्थापक प्रशांत कुमार, अनामिका मुखर्जी, दिनेश साळवे, जुही शहा यांच्यासह १४१ शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

दि अप्रेंटिस प्रोजेक्ट’ या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या १४१ शाळांमध्ये २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी आफ्टर-स्कूल मॉडेलची अंमलबजावणी




करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिंतनशीलता, सहकार्य आणि संवाद कौशल्ये विकसित करणे असून विद्यार्थ्यांना फक्त परीक्षांसाठीच नव्हे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर भर दिला जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कला, कोडिंग, तंत्रज्ञान, आर्थिक साक्षरता यांसारख्या जीवनावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असून त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार केले जाणार आहे. त्याच अनुषंगाने अंकुशराव लांडगे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शिक्षकांना उपक्रमाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, अभ्यासक्रम, विद्यार्थी व शिक्षक नोंदणी प्रक्रिया तसेच मुख्याध्यापक आणि नोडल अधिकाऱ्यांची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुस्तकी ज्ञानासोबतच कला, कोडिंग, तंत्रज्ञान आणि आर्थिक साक्षरता यांसारखी कौशल्ये अत्यावश्यक आहेत. ‘दि अप्रेंटिस प्रोजेक्ट’ या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वास वाढेल.**

**– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

**‘दि अप्रेंटिस प्रोजेक्ट’ हा उपक्रम सार्वजनिक शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करण्याचे एक मोठे पाऊल आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण आणि आफ्टर-स्कूल अनुभव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देईल.**

**– किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका**

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 16/09/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# सरिता साने सखी मंच वतीने सुवर्ण प्राशन डोस सवलतीच्या दरात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सरिता साने सखी मंच व वेद स्पर्श आयुर्वेदिक क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड मधील वयोगट 0 ते 16 वर्ष असलेल्या मुलांसाठी सुवर्णप्राशन चा पहिला डोस सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सुवर्णप्राशनचे फायदे रोगप्रतिकार क्षमता वाढवणे, स्मरणशक्ती व एकाग्रता वाढवणे तसेच वजन व उंची वाढण्यास मदत करणे व जंतुनाशक असे अनेक फायदे या सुवर्णप्राशन मुळे मुलांना मिळतात. दिनांक 15 सप्टेंबर ते 18 सप्टेंबर वेळ सकाळी 11 ते 6 या वेळेत सौ. सरिता साने यांचे जनसंपर्क कार्यालय साने चेंबर , निगडी प्राधिकरण, सत्यम ज्वेलर्स च्या बाजूला या ठिकाणी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तरी आकुर्डी , निगडी प्राधिकरण परिसरातील मुलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सौ. सरिता साने यांनी केले आहे.




# पिस्तुलाची स्टंटबाजी ; कामगार गंभीर जखमी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

तळेगाव एमआयडीसीतील मिंडेवाडी परिसरात घडलेल्या धक्कादायक प्रकारात दोन मित्रांनी केलेली पिस्तुलाची स्टंटबाजी जीवघेणी ठरली. या घटनेत विजयकुमार (वय २८) हा कामगार गंभीर जखमी झाला असून सध्या सोमाटणे फाटा येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे. पिस्तूल हाताळणारा त्याचा मित्र मंजरिन रजिफ मिया (वय २४) पोलिसांच्या ताब्यात असून त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



घटनेत जखमी आणि आरोपी हे दोघेही एका खाजगी कंपनीत कंत्राटी पद्धतीने काम करणारे मजूर असून मिंडेवाडी येथे भाड्याने घेतलेल्या खोलीत राहतात. शनिवारी (दि. १३) रात्री साडेसातच्या सुमारास दोघे कामावरून घरी परतत असताना मंजरिनने झुडपांत लपवलेली विनापरवाना पिस्तूल बाहेर काढली आणि हातात फिरवत स्टंटबाजी सुरू केली. अचानक ट्रिगर दाबला गेल्याने गोळी सुटून मोबाइलवर बोलत चाललेल्या विजयकुमारच्या पोटात घुसली.गोळी लागल्यानंतर सुरुवातीला या दोघांनी खरे प्रकरण लपवण्याचा प्रयत्न केला. मित्रांच्या मदतीने जखमीला खोलीवर नेले आणि नंतर रुग्णालयात दाखल केले. दरम्यान परिसरात गोळीबाराचा आवाज झाल्याची चर्चा सुरू झाली आणि पोलिसांना माहिती मिळाली. घटनेची चौकशी करताना आरोपी मंजरिनने दोन इसमांनी दुचाकीवरून येऊन आमच्यावर गोळीबार करत लूट केली अशी खोटी गोष्ट रचसी. परंतु पोलिसांनी केलेल्या कडक चौकशीनंतर त्याने कबुली दिली आणि पिस्तूल रस्त्यालगत गवतात लपवले असल्याची माहिती दिली.

तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी मंजरिनविरुद्ध विनापरवाना शस्त्र बाळगणे आणि निष्काळजीपणाने गोळीबार करून जखमी करण्याचा गुन्हा दाखल केला आहे.

रविवारी (दि. १४) सकाळी त्याला वडगाव मावळ न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेत संघटनात्मक फेरबदल

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेत संघटनात्मक फेरबदल करण्यात आले आहेत. पिंपरी-चिंचवड महानगर प्रमुखपदी राजेश वाबळे यांची वर्णी लागली आहे. पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघाच्या समन्वयकपदी बाळासाहेब वाल्हेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, जिल्हाप्रमुखपदी राजेश खांडभोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा संघटिकापदी शिलाताई भोंडवे यांची नियुक्ती केली आहे.उपमुख्यमंत्री, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार या नियुक्त्या केल्या आहेत. याबाबतची माहिती शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी दिली



आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, महापालिकेच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. गण, गट, प्रभाग रचना तयार करण्याचे काम सुरू आहे. पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना पूर्ण ताकदीने लढणार आहे. त्यादृष्टीने संघटना बांधणी, नियोजन सुरू आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनेतही बदल करण्यात आले आहेत. जिल्हाप्रमुख असलेले बाळासाहेब वाल्हेकर यांच्याकडे पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघाच्या समन्वयकपदाची जबाबदारी सोपविली आहे.

मावळ तालुकाप्रमुख असलेले राजेश खांडभोर यांची जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.उपजिल्हाप्रमुख असलेले राजेश वाबळे यांची पिंपरी-चिंचवड महानगर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघाच्या जिल्हा संघटिकापदी शिलाताई भोंडवे यांची नियुक्ती केली आहे. तर, मावळ तालुकाप्रमुखपदी राम सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेत संघटनात्मक बदल केले आहेत. शिवसेना पुणे जिल्ह्यातील सर्व निवडणुका पूर्ण ताकदीने लढणार आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मावळ लोकसभा मतदारसंघात संघटना आणखी मजबूत होईल.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, महापालिकेत शिवसेनेचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी झपाटून कामाला लागावे. केंद्र, राज्य सरकारचे निर्णय लोकांपर्यंत पोहोचववेत. राज्य सरकारच्या योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून द्यावा.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या प्रभाग नाम फलकाचे अनावरण

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पिंपरी चिंचवड शहरातर्फे प्रभाग क्रमांक 19 दळवी नगर , भाट नगर, आनंदनगर, विजयनगर, बौद्ध नगर, प्रभागाचे नाम फलकाचे अनावरण कुणाल भाऊ वाव्हळकर (शहराध्यक्ष पि.चि. शहर) यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख उपस्थिती-चंद्रकांता ताई सोनकांबळे ( अध्यक्ष महा, प्रदेश महिला आघाडी ) बाळासाहेब भागवत (उपाध्यक्ष महा, प्रदेश) अजिज भाई शेख (प्रदेशाध्यक्ष वाहतूक आघाडी ) धम्म रत्न गायकवाड ( युवक अध्यक्ष) कमलताई कांबळे (महिला अध्यक्ष) यांच्या उपस्थितीत संपन्न



झाले.यावेळी धम्मपाल तंतपाळे (वरिष्ठ उपाध्यक्ष पि.चि.शहर) दिनकर म्हस्के (वार्ड अध्यक्ष आनंद नगर चिंचवड) महादेव गुंजाळ (उपाध्यक्ष वाहतूक आघाडी ) संभाजी वाघमारे (उपाध्यक्ष पि.चि.शहर ) योगेश भोसले (कार्याध्यक्ष) वाघमारे ताई, साळवे ताई, सोनवणे ताई कांबळे ताई, राधाताई खंडागळे , प्रज्ञाताई कदम, शितलताई रणसुरे, ममता ताई पवार, नफिसा ताई खान, छायाताई तेलंगे, व संविधान महिला मंडळातील महिलाकार्यकर्त्या उपस्थित होत्या .यावेळी कुणाल भाऊ वाव्हळकर यांच्या हस्ते प्रभाग क्रमांक 19 चे नवरनिवाचित अध्यक्षपदी श्री अल्विन शेपर्ड व महिला प्रभाग अध्यक्षपदी वृषाली ताई कदम यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन आयु. सुंदर कांबळे (वरिष्ठ उपाध्यक्ष पि.चि. शहर वरिष्ठ उपाध्यक्ष) आयु. राजेंद्र भाऊ कांबळे (स्वीकृत नगरसेवक) सौ. अनिताताई सुंदर कांबळे (संस्थापक अध्यक्ष ) संविधान महिला मंडळ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता आकाश मित्र मंडळाचे संतोष कुचेकर , तानाजी पवार, वसंत कदम, कृष्णा यादव, विकी डोंगरे, विकास कांबळे, सागर कांबळे, संतोष पवार , करण सरोदे, व मंडळातील सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप भाऊ कांबळे यांनी केले व आभार धम्म रत्न गायकवाड (शहराध्यक्ष युवक आघाडी) यांनी मानले.